# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.
## जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई-०१.

## परिपत्रक

क्रमांक:-इएसटी१२१५/२-अ-१ मुंबई, ०२ फेब्रुवारी २०१६.

विषय:- रजा उपभोगण्यापूर्वी मंजूर करुन घेणेबाबत.

"या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की या विभागातील बरेचशे अधिकारी / कर्मचारी रजेवर जाण्यापूर्वी रजा मंजूर करुन न घेता आधी रजा उपभोगतात व नंतर रजा मंजूर करण्याबाबत अर्ज सादर करतात. तर काही अधिकारी / कर्मचारी रजा उपभोगुनही रजा मंजूर करण्यासासाठी अर्ज सादर करत नाही. सदर बाब कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही. सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी रजेवर जाण्यापूर्वी रजा मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

**तरी राज्य उत्पादन शुल्क विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी खालील सुचनांचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घ्यावी.**

राज्य उत्पादन शुल्क विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी किरकोळ रजा / अर्जित रजेचा अर्ज देऊन सक्षम अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर करुन घेऊनच मुख्यालय सोडण्याची दक्षता घ्यावी. तसेच वैद्यकीय कारणास्तव संबंधित अधिकारी / कर्मचारी अपरीहार्यरीत्या मुख्यालयात हजर राहू न शकल्यास अनुपस्थितीबाबत विनाविलंब सक्षम अधिकारी यांना दुरध्वनीवरुन तात्काळ कल्पना देण्यात यावी व त्यांना त्यांच्या तातडीच्या प्रतिक्षाधीन कामाबाबतही अवगत करावे व हजर झाल्याबरोबर लगेचच रजा मंजूर करुन घ्यावी.

काही अधिकारी /कर्मचारी कोणतीही परवानगी न घेता दीर्घकाळ गैरहजर राहून अचानक हजर होतात. संबंधीत अधिकारी / विभागीय उप आयुक्त / अधीक्षक अशा अधिकाऱ्यांच्या गैरहजरीबाबत त्यांच्यावर काहीही कार्यवाही न करता त्यांना हजर करुन घेतात. आणि रजा संपल्यानंतर रजा मंजूरीची प्रकरणे वरीष्ठाकडे पाठवितात. त्यामुळे गैहजर रहाण्याच्या प्रवृत्तीमध्ये वाढ होते किंवा त्यांस उत्तेजन दिल्याप्रमाणे होते.

यापुढे सर्व उप आयुक्त /अधीक्षक/ विभागीय उप आयुक्त यांनी दुय्यम अधिकाऱ्यांत " शिस्तीचे वातावरण निर्माण व्हावे " म्हणून त्यांच्या कार्यालयातील गैरहजर राहून शासकीय कामात दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर खालील प्रमाणे वेळीच कारवाई करण्याची दक्षता घ्यावी.

१) ज्या व्यक्ती अनधिकृतपणे (रजा मंजूर करुन न घेता ) गैरहजर राहतात अशा व्यक्तींचा अनधिकृत रजेचा कालावधी विनावेतन रजा म्हणून मंजूर करण्यात यावा आणि या बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात यावी. तसेच

१३५
५/२/२०१६

प्रथम उपलब्ध असलेल्या सर्व पत्यांवर/ प्रतिनिधींमार्फत नोटीस पाठवून गैरहजेरी बाबत खुलासा मागवावा.

२) विभागीय उपआयुक्त / अधीक्षक यांनी वारंवार अनधिकृत गैरहजर राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या या प्रवृत्तीची नोंद संबधितांच्या गोपनीय अहवालात न चुकता घेतली जाईल याची दक्षता घ्यावी.

३) काही अधिकारी अर्जासोबत खाजगी डॉक्टरचे दाखले जोडून अर्ज करतात. अर्जासोबतच्या दाखल्याची सत्यता पडताळण्यासाठी अशा अर्जदारांना वैद्यकीय मंडळासमोर पाठवून मंडळाचे दाखले सादर करण्यास कळवावे

४) तसेच बदली आदेशानुसार कार्यमुक्त केलेले काही अधिकारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी अद्याप हजर झालेले नाहीत. तरी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम ३ चे उल्लंघन केले असल्याने त्यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब विभागीय उपआयुक्त व अधिक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गैरहजर अधिकाऱ्यांचा आढावा घेऊन त्यांच्या विरुदध शिस्तभंगाची कार्यवाही तात्काळ सुरु करावी आणि यापुढे हजर न झालेले अधिकाऱ्यांच्या बद्दल लेखी आणि दुरध्वनीद्वारे आयुक्त कार्यालयास त्वरित कल्पना देण्यात यावी.

वरील प्रमाणे खुलासा मागवूनही संबंधीत अधिकारी /कर्मचाऱ्यांनी प्रतीसाद न दिल्यास किंवा दिलेला खुलासा अस्विकारहार्य असल्यास व खुलासा शाबीत करणारी पुरावे सादर केले नसल्यास संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

(विजय सिंघल)
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
२. सर्व विभागीय उप आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क.
४. .या कार्यालयातील सर्व कार्यासने. व १२ (५ प्रती)

सर्व विभागीय उप आयुक्त / सर्व अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क व या कार्यालयातील सर्व कार्यालय अधीक्षकांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

२१/२/१६

(तनुजा दांडेकर)
सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

C:\Users\admin\Documents\AZIZ SHAIKH\Circular reg Leave sanctioned.odt